# ज्ञानदीप पुरस्कार २००९

( 'पारधी' चे लेखक श्री. गिरीश प्रभुणे यांना ज्ञानदीप पुरस्कार देण्याचा समारंभ नुकताच चिंचवड येथे संपन्न झाला. या समारंभात मराठी माणूस डॉट कॉम चे प्रतिनिधी श्री. राहुल जोशी यांनी केलेले सत्काराचे भाषण )



मला आज श्री. गिरीश प्रभुणे या साठी ओलांडलेल्या तरुणाचा सत्कार करण्याचे भाग्य लाभले आहे. एखाद्या संस्थेचे निष्ठापूर्वक काम कसे करावे हे जाणून घ्यायचे असेल तर श्री. प्रभुणे यांच्या आजपर्यंतच्या प्रवासाचा वेध घेतला पाहिजे.

श्री. प्रभुणे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ता, विभागप्रमुख व पुढे पुणे जिल्हा संघ प्रचालक अशी विविध पदांवर काम केले. श्री. ग. माजगावकारांच्या ग्रामायन संस्थेमध्ये त्यांनी बरीच वर्षे कार्य केले. 'ग्रामायन' मध्ये काम करत असतांना त्यांनी विमुक्त जाती–जमातींच्या समस्या व प्रश्नांना वाचा फोडली. हे करत असतांना पाठीशी बांधलेला अनुभव त्यांनी पुस्तकरूपाने लोकांपर्यंत पोहोचविला आहे. कदाचित 'यमगरवाडी' प्रकल्पामुळे भटक्या विमुक्त जातींकडे त्यांचे लक्ष गेले आणि त्यांना त्यांच्या विमुक्तीसाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळाली.

पहिल्याप्रथम 'लाटांखाली संथ पाणी' ही कादंबरी, तसेच नंतर त्यांचा 'पालावरील जीणं' हा लेखसंग्रह प्रसिद्ध झाला. गेली वीस पंचवीस वर्षे विमुक्त जातीसाठी काम

करतांना त्यांना आलेल्या अनुभवांवर आधारित 'पारधी' हे पुस्तक वर्षभरापूर्वीच प्रकाशित झाले आहे. यापुस्तकातून मिळणारे एकविसाव्या शतकातील भारताच्या विषम समाजव्यवस्थेचे विदारक चित्र आपल्याला हलवून टाकते.

श्री. गिरीश प्रभुणेंना पाहिल्यावर एक तळमळीचा कार्यकर्ता, समाजप्रबोधनकार, समाजसेवेच्या व्रताने झपाटलेल्या योग्याचे दर्शन घडते. पारधी समाजातील भावी पिढीसाठी, अनाथ मुला–मुलींसाठी उभारलेले 'पुनरुत्थान समरसता गुरुकुल' हे येथील आश्रमस्वरूप वसतीगृह श्री. प्रभुणेंच्या आजपर्यंतच्या रचनात्मक कार्याच्या इमारतीतील एक उज्वल असे दालनच म्हटले पाहिजे.

दरवर्षी अमेरिकेतील फिलाडेल्फिया स्थित 'मराठी माणूस डॉट कॉम' या संस्थेमार्फत मराठीतील नवप्रकाशित पुस्तकास 'ज्ञानदीप पुरस्कार' दिला जातो. या पुरस्कारासाठी मराठी भाषेविषयीची आत्मीयता व आदर या खेरीज पुरस्कारप्राप्त व्यक्तीच्या कार्याचीही दखल घेतली जाते. प्रभूणेंच्या या कार्याची व 'पारधी' या पुस्तकरूपी स्वानुभवाची दखल 'मराठी माणूस डॉट कॉम' ने घेतली आहे. मी युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हेनिया, फिलाडेल्फिया येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिकत असल्यामुळे माझा या संस्थेशी संबंध आला. म्हणूनच या पुरस्कारासाठी मी एक निमित्तमात्र आहे. श्री. प्रभुणेंना भेटण्याची, त्यांचे कार्य जवळून पाहण्याची आणि आता त्यांचा सन्मान करण्याची संधी मला लाभली हे मी माझं भाग्य समजतो.

समाजसेवेचं काम अविरत सुरू राहण्यासाठी लागणारे सामर्थ्य आणि दीर्घ व उत्तम आयु:आरोग्य श्री. प्रभुणेंना लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!